# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१०११७/२१/अ.क्र.४७८५/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०११६/२१/अ.क्र.४७८६/२५/०१**

**श्री. जिग्नेश शर्मा**
जी-१, जोशी भवन,
गोल गार्डन जवळ, पोद्दार रोड,
मालाड (पू.) मुंबई-४०००९७

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पजवा)**
**पश्चिम उपनगरे के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.)
पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय, ग्रीन वुडस को.ऑप.हौ.सोसा.
अंधेरी-कुर्ला रोड, चकाला अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पजवा)**
**पश्चिम उपनगरे परि-३**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.)
पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय, ग्रीन वुडस को.ऑप.हौ.सोसा.
अंधेरी-कुर्ला रोड, चकाला अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९३.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०९.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१२.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पजवा) पश्चिम उपनगरे के/पूर्व विभाग, श्री. विशाल कुलकर्णी उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पजवा) पश्चिम उपनगरे परि-३ अनुपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी श्री. जिग्नेश शर्मा यांनी दाखल केलेल्या दि.२८.१२.२०२० रोजीच्या मूळ जोडपत्र-अ नुसार WS-490, WS-505 याची माहिती मागितली असून कोविड कालावधीत उपरोक्त माहिती सशुल्क देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. मात्र दरम्यानच्या काळात वरील माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ४(१)(ख) तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर सर्वच नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिली असून, वरील माहिती ही प्रत्यक्षात नागरिकांसाठी उघड केली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.

**आदेश**

**वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १२.०९.२०२५**